# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 25\ /2020 दिनांक: 25 / 04/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 216 /2020 दिनांक 19.04.2020
5. अधीक्षक, अकोला जिल्हा कारागृह यांचे पत्र क्र. वतु/कोरोना/ उपाययोजना/ 954/2020 दिनांक 17.04.2020
6. उपविभागीय अधिकारी, अकोला यांचे पत्र क्र. नैआ/वाररुम/उविअ/कावि 277/2020 दिनांक 24.4.2020

**( तात्पुरत्या कारागृहासाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत.)**

## *आदेश*

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 216 /2020 दिनांक 19.04.2020 नुसार अकोला जिल्हयात दिनांक 03.05.2020 रोजीचे मध्यरात्रीपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे.**आणि**

**ज्या अर्थी**, अकोला जिल्हा कारागृहातील बंद्यांना कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव टाळणेसाठी दररोज दाखल होणा-या बंद्यांचा प्रवेश थांबविणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता तात्पुरत्या स्वरुपात एखाद्या इमारतीस कारागृह घोषीत करुन नविन दाखल बंद्यांना 15 दिवसाकरिता विलगीकरण करुन ठेवणे शक्य होईल, त्याकरिता ठिकाण निश्चित करुन मिळणे बाबत अधीक्षक,जिल्हा कारागृह अकोला यांनी विनंती केली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, उपविभागीय अधिकारी,अकोला यांनी रेल्वे स्टेशन अकोला येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जूने रेस्ट हाऊसची ईमारत ही नविन बंद्यांना ठेवण्यासाठी तात्पुरते कारागृह म्हणून निश्चित करण्यास योग्य असल्याबाबत कळविले आहे.

**त्या अर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला , आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचना** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, अकोला जिल्हा कारागृहातील बंद्यांना कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव टाळणेसाठी, दररोज नव्याने दाखल होणा-या बंद्यांना 15 दिवसांकरिता विलगीकरणात ठेवण्याचे दृष्टीने उपविभागीय अधिकारी अकोला यांनी निश्चित केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग,अकोला यांचे अधिनस्त असलेली अकोला रेल्वे स्टेशन जवळील जूने विश्रामगृहाची ईमारत तात्पुरते कारागृह म्हणून स्थापन करण्याकरिता अधीक्षक, जिल्हा कारागृह, अकोला यांचे ताब्यात देण्याबाबतचे आदेशीत करीत आहे.

..2..

NitinN 353

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी अकोला रेल्वे स्टेशन जवळील जूने विश्रामगृहाची ईमारत, अधीक्षक, जिल्हा कारागृह, अकोला यांना तातडीने आवश्यक पूर्तता करुन उपलब्ध करुन देण्यात यावे.

अधीक्षक, जिल्हा कारागृह, अकोला यांनी उपरोक्त नमूद इमारतीमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने व दैनंदिन कामकाजाकरिता पूरेसा कर्मचारीवर्ग नियुक्त करुन तात्पुरत्या स्वरुपात कारागृह निर्मीतीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 25 **एप्रिल** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी –**

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. आयुक्त, महानगरपालिका अकोला
4. **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमुद केल्यानुसार आपले अधिनस्त विश्रामगृहाची इमारात ही अधिक्षक, जिल्हा कारागृह अकोला यांना तातडीने आवश्यक पूर्तता करुन उपलब्ध करुन देण्यात यावे.
5. उपविभागीय अधिकारी अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. तहसिलदार अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. **अधिक्षक, जिल्हा कारागृह, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर इमारतीचा वापर तात्पुरत्या स्वरुपात बंद्यांचे कारागृहाकरिता करित असतांना आवश्यक उपाययोजना करतांना कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांना अवगत करावे.
8. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला